I.O. प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** फुलंब्री **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0171 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/06/2020 02:21 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 02/06/2020
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/06/2020
**Time From (वेळेपासून):** 14:46 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/06/2020 **Time (वेळ):** 02:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/06/2020 02:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बालाजी आप्टीकल्स,फुलंब्री,फुलंब्री

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कैलास सांडु भोसले.

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | धामणगाव,फुलंब्री,फुलंब्री,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | धामणगाव,फुलंब्री,फुलंब्री,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय): Mobile (मोबाइल नं.):

(j) Phone number (फोन नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनय नागोराव आरमाळ | | | 1. 14/1,श्री हाऊसींग सोसायटी एन-8सिडको,औरंगाबाद,फुलंब्री,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | सहा हाजार रुपये | 6,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 6,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 03/06/2020मी खालील सही करणार कैलास सांडु भोसले, वय-38 वर्ष, व्यवसाय शेत मजुरी रा. धामणगाव ता.फुलंब्री जि.औरंगाबाद समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा राहणारा असुन, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन
मी शेतमजुरी करतो. मला तीन भाऊ नामे 1)जगदीश सांडु भोसले 2) प्रभाकर सांडु भोसले 3)विकास सांडु भोसले असे आहेत आम्ही सर्व
वेगवेगळे राहतो माझे आई वडील माझा भाऊ नामे विकास याचेसोबत राहतात. माझा भाऊ नामे जगदीश सांडु भोसले,प्रभाकर सांडु भासेले व
पुतण्या नामे सुभाष तुकाराम भोसले व पतण्या नामे संतोष भोसले याची पत्नी नामे मंगल संतोष भोसले असे यांनी सन-2018-2019 मध्ये
स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत स्वच्छालय बांधुन मिळणे बाबत धामनगाव ग्रामपंचायत ठरावामध्ये नावे दिलेली होती. त्यावरुन माझ्या
वरील भावांचे व पुतण्या नामे सुभाष भोसले, पुतनसुन मंगल भोसले यांचे नावे स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत स्वच्छालय मंजुर झालेले
असुन प्रत्येक लाभार्थ◌ाचे नावे 12,000/-रुप्ये अनुदान ग्रामपंचायतचे खात्यात मध्ये जमा झालेले आहेत.माझा भाऊ नामे जगदीश भोसले व
प्रभाकर भोसले हे रोजगारा निमीत्त बाहेर असतात. मी घरात मोठा आहे त्यामुळे त्यांचे काही कामे मी करतो. माझ्या दोन्ही भावांचे ,पुतण्या नामे
सुभाष भोसले,व पुतनसुन मंगल भोसले यांचे स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत मंजुर झालेली रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी
आमच्या गावातील ग्रामसेवक श्री.आरमाळ यांची भेट घेतली त्यावेळी मी श्री.आरमाळ ग्रामसेवक यांना म्हणालो की,माझ्या भावांचे व पुतण्याची
स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत स्वच्छालयाची रक्कम मंजुर झालेली आहे, सदरची रक्कम ग्रामपंचायत च्या खात्यातुन त्यांच्या खात्यात
टाकुन दया असे म्हणालो असता श्री.आरमाळ ग्रामसेवक मला म्हणाले की, त्यासाठी मी प्रत्येक लाभार्थाकडुन 2000/-रुपये घेतो तुम्ही पण
मला प्रत्येकी 2000/- हजार रुपये त्यांच्याकडुन घेवुन दया असे म्हणाले त्यावर मी श्री.आरमाळ ग्रामसेवक यांना म्हणालो की,साहेब माझे भाऊ
व पुतण्या गरीब आहेत ते मजुरी करतात त्यांच्याकडे एवढे पैसे नाही. त्यावर श्री. आरमाळ-ग्रामसेवक हे मला म्हणाले की, तुम्ही जर मला
प्रत्येक लाभार्थीचे 2,000/-रुपये नाही दिले तर मी तुमच्या भावांचे व पुतण्याचे स्वच्छ भारत अभियान योजने अंतर्गत मंजुर झालेली रक्कम
त्यांच्या खात्यात टाकणार नाही.मी जर श्री.आरमाळ ग्रामसेवक यांना माझे वरिल लाभार्थीचे प्रत्येकी 2,000/- रुपये दिले नाही तर ते स्वच्छ
भारत अभियान योजने अंतर्गत मंजुर झालेली रक्कम त्यांचे खात्यावर टाकणार नाही. त्यामुळे मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो आहे.मला श्री.
आरमाळ ग्रामसेवक यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतीबंध विभाग,औरंगाबाद येथे त्यांच्या विरुध्द तक्रार देण्यासाठी आलो
आहे. श्री.आरमाळ यांचे सोबत माझा उसनवारीचा किंवा देण्याघेण्याचा काही एक व्यवहार नाही. तसेच माझे त्यांचेशी काहीएक वैर-दुष्मनी नाही.
मी श्री.आरमाळ ग्रामसेवक यांना दि.02/06/2020 रोजी ग्रामपंचायत धामणगाव येथे भेटण्यासाठी जाणार आहे.तेव्हा श्री.आरमाळ ग्रामसेवक

यांनी माझ्याकडे माझ्या भावांचे, पुतण्याचे व पुतनसुन यांचे स्वच्छ भारत अभियान योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या स्वच्छतागृहाची रक्कम ग्रामपंचायत खात्यातुन त्यांचे खात्यात टाकण्यासाठी प्रत्येकी 2,000/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम श्री.आरमाळ ग्रामसेवक यांनी स्वत:अगर दुसऱ्या मार्फत स्वीकारल्या नंतर त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी हि विनंती आहे.अशी तक्रार मी लाचलुचपत प्रतीबंध विभाग औरंगाबाद येथे दिनांक 01/06/2020 रोजी दिलेली होती. त्या प्रमाणे पोलीस निरीक्षक गणेश धोक्रट यांनी माझी लोकसेवक श्री. आरमाळ यांचे विरुध्द तक्रार नोंदवुन घेतली होती.त्यानंतर पो.नि.गणेश धोक्रट यांनी मी दिलेली तक्रार पंचाना वाचावयास दिली पंचानी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर सहया केल्या व पोलीस निरीक्षक गणेश धोक्रट यांनी सदर तक्रारीवर समक्ष म्हणुन सही केली. त्यानंतर पो.नि.धोक्रट यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी मला धामणगाव ता.फुलंब्री.जि.औरंगाबाद चे अलिकडे सुरक्षित ठिकाणी दिनांक 02/06/2020 रोजी सकाळी 10.30 वाजता येवुन थांबण्याबाबत सुचना दिली होती.त्यानंतर पोलिस निरिक्षक गणेश धोक्रट यांनी मला दिलेल्या सुचनेवरुन मी व माझ्या सोबत माझा पुतण्या सुभाष भोसले असे ता.फुलंब्री जि.औरंगाबाद येथिल बील्डा फाटा येथे हजर आल्याचे पोलिस निरिक्षक गणेश धोक्रट यांना फोनद्वारे सांगीतले.त्यावरुन पो.नि.धोक्रट व त्यांचे सोबत सापळा पथक व शासकीय पंच असे शासकीय वाहनातुन बील्डा फाटा ता.फुलंब्री जि. औरंगाबाद येथे आले.तेथे आल्यानंतर मी पोलीस निरीक्षक गणेश धोक्रट यांना श्री.आरमाळ साहेब हे ता.फुलंब्री येथिल पंचायत समीती कार्यालयात येणार असल्याचे सांगीतले व तेथे त्यांची भेट होईल असे सांगीतले.त्यावरुन सापळा पथक व आम्ही फुलंब्री गावाकडे रवाना झालो. फुलंब्री गावाचे अलीकडे सुरक्षीत ठिकाणी पोलीस निरीक्षक गणेश धोक्रट यांनी त्यांचे शासकीय वाहन थांबवीले.त्या पाठोपाठ मी माझी मोटार सायकल थांबवीली सदर ठिकाणी पो.नि.गणेश धोक्रट यांनी मला,माझां पुतण्या व पडताळणी पथकास आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर मी श्री. आरमाळ ग्रामसेवक यांची भेट घेण्यासाठी पंच श्री.पंदीलवाड व माझा पुतण्या सुभाष भोसले यांचेसह माझे मोटार सायकल रवाना होण्यापुर्वी पो. नि.धोक्रट यांचे सुचने प्रमाणे पोना बाम्हंदे यांनी मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला.त्यानंतर मी, माझा पुतण्या सुभाष भोसले व पंच पंदीलवाड असे श्री.आरमाळ ग्रामसेवक यांना भेटण्यासाठी माझे मोटार सायकल रवाना झालो.मी पंचायत समीती कार्यालय,फुलंब्री ता.फुलंब्री जि. औरंगाबाद येथिल कार्यालय येथे गेलो असता पंचायत समीती कार्यालयाचे आवारात माझी श्री.आरमाळ ग्रामसेवक यांच्याशी भेट झाली त्यावेळी माझे व श्री.आरमाळ ग्रामसेवक यांच्यामध्ये माझ्या भावाचे,पुतण्याचे व पुतणसुन यांचे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छालयाची रक्कम ग्रामपंचायत च्या खात्यावरुन माझे वरिल नातेवाईकांच्या खात्यावर टाकणे बाबत चर्चा झाली.त्यामध्ये श्री.आरमाळ ग्रामसेवक हे मला म्हणाले की, दोन हजार दया ना,एका याला.त्यावर मी त्यांना म्हणालो की, माझ्याकडुन काही एखाद कमी जास्त नाही का,त्यावर श्री.आरमाळ ग्रामसेवक मला म्हणाले की, तुमच्या साठीच कमीच केलं न राव असं थोडी असत. त्यावर मी श्री.आरमाळ ग्रामसेवक यांना म्हणालो की, मगं हे तीन हे तीनचे देवुन टाकतो किती दयाचे किती दयाचे मग त्या तीनचे क्लीयर सांगा.त्यावर श्री.आरमाळ ग्रामसेवक मला म्हणाले की,सहा दया ना असे बोलुन त्यांनी मला सहा हजार रुपये लाचेची मागणी केली.व पंधरा वीस मिनीटात फोन केल्यानंतर ता.फुलंब्री जि. औरंगाबाद येथील चष्माचे दुकानात घेवुन येण्याचे सांगीतले. त्यानंतर मी माझा पुतण्या व पंच असे सापळा कारवाईचे पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यानंतर सापळा पथकातील एका सदस्याने माझ्याकडील व्हाईस रेकर्डर बंद केले. त्यानंतर पोनि गणेश धोक्रट यांनी मला व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली. ऍन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म मला व पंचाना समजावुन सांगुन त्यांचे प्रात्यक्षीक दाखवीण्यात आले.व मी जमा केलेली लाचेची रक्कम रुपये 6,000/- रुपये च्या भारतीय चलणी नोटांना ऍन्थ्रासीन पावडर लावुन श्री.आरमाळ, ग्रामसेवक यांना देण्याकरीता माझे नेसणीस असलेल्या पन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवली.त्यानंतर पोनि धोक्रट यांच्या सुचनेवरुन पोना/बाम्हंदे यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे दिला.त्यांनतर मी पंच श्री. पंदीलवाड व माझा पुतण्या सुभाष भोसले यांचेसह सुरक्षित ठिकाणाहुन पायीपायी बालाजी ऑप्टीकल नावाचे दुकाणात ता.फुलंब्री जि.औरंगाबादकडे निघालो त्या पाठोपाठआमचे मागुन सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने थांबले. मी बालाजी ऑप्टीकल चे दुकाणात गेलो असता, तेथे आरमाळ ग्रामसेवक हे हजर होते.त्यानंतर माझे व श्री.आरमाळ यांचेमधे बोलणे झाले.त्यानंतर मी लाचेची रक्कम माझे नेसणीस असलेल्या पन्टचे उजव्या खिशातुन काढुन ग्रामसेवक श्री.आरमाळ यांचेसमोर धरली असता त्यांनी सदर लाचेची रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारल्यानंतर त्यांनी ती त्यांनी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर लागलीच मी सापळा पथकास श्री. आरमाळ, ग्रामसेवक यांनी लाच स्वीकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. ती वेळ 14.46 वाजताची होती. त्यावर लागलीच पोलीस पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी श्री.आरमाळ, ग्रामसेवक यांना ताब्यात घेतले. त्यानंतर श्री.आरमाळ ग्रामसेवक यांनी परिधान केलेल्या शर्टचे समोरील खिशातुन पंचानी लाचेची रक्कम रुपये 6,000/-रुपये हस्तगत केली. त्यानंतर श्री.आरमाळ, ग्रामसेवक यांना त्यांचे संपुर्ण नाव पत्ता विचारण्यात आला.करीता लोकसेवक श्री.विनय नागोराव आरमाळ,ग्रामसेवक , ग्रामपंचायत धामनगाव, ता.फुलंब्री.जि.औरंगाबाद यांनी मला माझे भावाचे,पुतण्याचे व पुतण सुणेचे स्वच्छ भारत अभियान योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या स्वच्छतागृहाची रक्कम ग्रामपंचायत खात्यातुन त्यांचे खात्यात टाकण्यासाठी प्रत्येकी 2000/- असे तीन लाभार्थीचे 6,000/- रुपये लाचेची मागणी स्वत:च्या फायदयाकरीता करुन सदर लाचेची रक्कम स्वतः स्वीकारली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
समक्ष हि फिर्याद दिली.

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** Damodhar Raghoji Waghmare
**Rank (पद):** SI (Sub-Inspector)
**No.(क्र.):** PSI **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नंकार दिला):**

56

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy iven to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर ोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार

Signature of Officer in charge, Police Station (पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची)

Name (नाव): Samratsing Vijaysing Rajaput

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**